

एकनाथ शिंदे यांच्याकडून जय महाराष्ट्र' ऐवजी 'जय गुजरात'!! e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in शनिवार दिनांक 05/07/२०२5 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 147 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# संपूर्ण विश्वात आपला देश पुढे राहील -अमित शाह

## संघर्ष करावा लागला तर आपली सेना नेतृत्व करेल ; ऑपरेशन सिंदूर याचे उदाहरण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पुणे : संपूर्ण विश्वात प्रत्येक क्षेत्रात आपला देश पुढे राहील हे आपले जीवन ध्येय असले पाहिजे, यासाठीची प्रेरणा आणि ऊर्जा पहिले बाजीराव पेशवे यांच्या जीवनचरित्रातून मिळते, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले.

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) परिसरातील त्रिशक्ती गेट येथे उभारण्यात आलेल्या थोरले बाजीराव पेशवे यांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या अनावरण कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, नागरी विमान वाहतूक केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानचे अध्यक्ष एअर मार्शल (नि.) भूषण गोखले, लष्कराच्या दक्षिण कमांडचे प्रमुख ले. जनरल धीरज शेठ, एनडीएचे कमांडंट व्हाईस ॲडमिरल गुरचरण सिंग, खासदार मेधा कुलकर्णी, माजी मंत्री रविंद्र चव्हाण, थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानचे सचिव कुंदनकुमार साठे आदी उपस्थित होते.केंद्रीय गृहमंत्री शाह म्हणाले, पहिल्या बाजीरावांनी तंजावर ते अफगाणीस्तानपर्यंत आणि अफगाणीस्तान ते बंगाल कटकपर्यंत मोठ्या हिंदवी साम्राज्याची स्थापना केली जे छत्रपती शिवरायांचे स्वप्न होते. बाजीरावांनी युद्ध नियोजनातील वेग, रणकौशल्य, रणनीती आणि वीर सोबत्यांच्या साथीने अनेक पराभवांना विजयात रुपांतरीत केले. पालखेडच्या विजयाचा अभ्यास बारकाईने केल्यास हा अकल्पनीय होता हे लक्षात येईल. गुलामीचे निशाण उध्वस्त करुन स्वातंत्र्याचा दीप लावण्याचे काम त्यांनी यशस्वीपणे केले. देश-विदेशातील अनेक युद्धकौशल्यातील अभ्यासू सेनानींनी त्यांच्या युद्धकौशल्याविषयी गौरविले आहे.

पहिले बाजीराव यांचे स्मारक बनविण्याची सर्वात उचित जागा कोणती असेल तर ती 'एनडीएच'. कारण येथून देशाच्या तिन्ही सेनादलांचे प्रमुख अधिकारी प्रशिक्षित होऊन बाहेर पडत असतात.

येथून बाहेर पडताना श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या जीवनकाळाचा अभ्यास करून जेव्हा भविष्यातील सेनानी जातील तेव्हा भारताच्या सीमांना स्पर्श करण्याचे धाडस कोणी करणार नाही.

भविष्यात स्वराज्य टिकविण्यासाठी संघर्ष करावा लागल्यास आपली सेना आणि नेतृत्व निश्चित करेल. ऑपरेशन सिंदूर हे याचे उदाहरण आहे, असेही ते म्हणाले.

# खासदार सुप्रिया सुळेंचा हिंजवडीत रस्ते पाहणी दौरा!!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी चिंचवड शहरातील हिंजवडी मध्ये खासदार सुप्रिया सुळे यांनी शुक्रवार (दि. ०४) रोजी दौरा केला. सुप्रिया सुळे हे पुणे शहराच्या दौऱ्यावर होत्या. त्यांनी विविध भागातील रस्त्यांची पाहणी केली, सकाळी साडेआठ वाजल्यापासून त्या पाहणी दौऱ्यावर होत्या..सुप्रिया सुळे यांनी रस्त्याची पाहणी करताना आयटी अभियंत्यांनी त्यांची व्यथा मांडली. यावेळी सुप्रिया सुळे यांनी थेट संबंधित अधिकाऱ्यांना फोन करून सूचना केल्या.सुविधांची वानवा होत असल्याने गेल्या काही दिवसांपासून हिंजवडी ग्रामपंचायत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात यावी, ही मागणी चर्चेत होती. याबाबत स्थानिकांमध्ये संमिश्र प्रतिक्रिया असून आयटी अभियंते यांची यावर ठाम भूमिका आहे. अखेर रस्त्यांवर तुंबलेले पाणी आणि रस्त्यांची झालेली दयनीय अवस्था यासाठी खासदार सुप्रिया सुळे या रस्त्यावर उतरल्या असून त्यांनी पाहणी दौरा सुरू केला आहे. सकाळी साडेआठ पासून सुरू झालेल्या दौऱ्याची सुरुवात फेज वन ते मानगाव रस्त्याची पाहणी सुरुवात केली.

त्यानंतर फेज तीन मेट्रो स्टेशन कारशेड जवळील रस्त्याची पाहणी, फेज तीन मेगापोलीस या ठिकाणच्या रस्त्यांची पाहणी, भोईरवाडी रोड या ठिकाणच्या रस्त्यांची पाहणी, फेस दोन मधील मॅकडॉनल्ड्स जवळील रस्त्याची पाहणी आणि मारुंजी रस्ता टी जंक्शन या ठिकाणचे रस्त्याची पाहणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली.या पाहणी दौऱ्यानंतर आयटी अभियंत्यांनी रस्त्यावर साचत असलेलं पाणी कचरा आणि रस्त्यांची दुरावस्था यासंबंधी तक्रार खासदार सुळे यांच्याकडे केली हिंजवडी मध्ये काही दिवसांपासून रस्त्यांना नदीचे स्वरूप आलं होतं याबाबत स्वतः सुप्रिया सुळे यांनी देखील लक्ष घातलं होतं आता त्या स्वतः येऊन रस्त्याची पाहणी करून या आयटी हब मधील अभियंत्यांची समस्यांकडे लक्ष देत आहेत.

# एकनाथ शिंदे यांच्याकडून जय महाराष्ट्र' ऐवजी 'जय गुजरात'!!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : पुण्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'जय महाराष्ट्र' ऐवजी 'जय गुजरात' अशी घोषणा दिली. 'जय गुजरात' अशी घोषणा दिल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार देखील उपस्थित होते.राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी



(एनडीए) परिसरातील त्रिशक्ती गेट येथे उभारण्यात आलेल्या थोरले बाजीराव पेशवे यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानचे अध्यक्ष एअर मार्शल (नि.) भूषण गोखले, लष्कराच्या दक्षिण कमांडचे प्रमुख ले. जनरल धीरज शेठ, एनडीएचे कमांडंट व्हाईस ॲडमिरल गुरचरण सिंग, खासदार मेधा कुलकर्णी, माजी मंत्री रविंद्र चव्हाण, थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानचे सचिव कुंदनकुमार साठे आदी उपस्थित होते.

एकनाथ शिंदे यांनी जय गुजरात अशी घोषणा दिल्यानंतर यावर आता राजकीय नेत्यांची प्रतिक्रिया यायला सुरुवात झाली आहे. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी देखील "विना शकले, विपरीत बुद्धी" असे उच्चार यावेळी केले आहे.

तर दुसरीकडे शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी म्हटले आहे की, आता हिंदी नंतर गुजराती भाषा महाराष्ट्रात येणार आहे का? असा प्रश्न त्यांनी यावेळी उपस्थित केला आहे. त्याच प्रमाणात राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

# महापालिकेच्या तिमाहीत 522 कोटी कर वसुलीच्या यशानंतर कर्मचाऱ्यांचा गौरव

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत म्हणजेच ९० दिवसांच्या कालावधीत ५२२ कोटी रुपयांची ऐतिहासिक कर वसुली करून नवा विक्रम केला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते कर वसुली मोहिमेमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेल्या १० कर्मचारी आणि तीन विभागीय कार्यालयांच प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्ह देऊन कार्याचा गौरव करण्यात आला.



या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, तृप्ती सांडभोर, सह आयुक्त मनोज लोणकर, नगर सचिव मुकेश कोळप, कर संकलन विभागाचे कार्यालय अधिक्षक चंद्रकांत विरणक यांच्या सह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या प्रसंगी आयुक्त शेखर सिंह यांनी म्हटले की, महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी दाखविलेली कार्यक्षमता आणि निष्ठा अत्यंत प्रशंसनीय आहे. पहिल्या तिमाहीतच ५२२ कोटी रुपयांची वसुली करणे हे महापालिकेच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. महापालिकेची आर्थिक स्थिरता टिकवून ठेवण्यासाठी आणि विकास कामांना गती देण्यासाठी कर संकलन अत्यंत महत्त्वाचे आहे. कर्मचाऱ्यांनी दाखविलेल्या या कार्यक्षमतेमुळे आम्ही या आर्थिक वर्षात १२०० कोटी रुपयांच्या कर वसुलीचे लक्ष्य गाठू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मालमत्ता कर संकलन मोहिमेत उल्लेखनीय कामकाज केल्यामुळे वाकड, चिखली, मोशी या विभागीय कार्यालयांसह सहायक मंडलाधिकारी अजित नखाते, मिनाक्षी पवार, बाळू लोंढे, लिपिक संतोष हाके, प्रकाश सदाफुले, कांचन भवारी तसेच शिपाई सदाशिव कोंडे, सागर रोकडे, प्रविण फुलावरे व माजी सहाय्यक आयुक्त नाना मोरे यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच आयुक्त शेखर सिंह यांनी फॉक्सबेरी टेक्नोलॉजी टीमचे सन्मान चिन्ह देऊन कौतुक केले. सिटी हब फॉर डेटा कम्युनिकेश उपक्रमांतर्गत कर आकारणी व कर संकलन विभागामध्ये माहिती विश्लेषण, प्रभावी जनजागृती, घरपोच बिल वाटप यासह इतर कामांत फॉक्सबेरी टेक्नोलॉजी टीमने करदात्यांपर्यंत पोहोचण्यात महत्त्वपूर्ण मदत केल्याचे आयुक्तांनी यावेळी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

# शाळकरी मुलीचा विनयभंग करणारा क्रीडा शिक्षक अटकेत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : शाळकरी मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी एका शाळेतील क्रीडा शिक्षकाला चंदननगर पोलिसांनी अटक केली. मंगेश बोराटे (वय ४०, रा. चंदननगर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत शाळकरी मुलीच्या आईने चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. बोराटे याच्याविरुद्ध विनयभंग, तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायद्यातील कलमांन्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ वर्षीय पीडित मुलगी चंदननगर भागातील एका शाळेत आहे. आरोपी बोराटे हा क्रीडा शिक्षक आहे. 'मुलींनी चांगला व्यायाम केला तर त्यांच्याकडे मुले बघतील. तुला मित्र आहे का ?, तसेच मुली हसल्यानंतर मुलांची धडकन वाढते', असे पीडित मुलीला बोराटे म्हणाला होता. वर्गात असे प्रश्न विचारल्याने मुलीच्या मनात लज्जा निर्माण झाली, असे मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

आईने पोलिसांकडे याबाबत तक्रार दिल्यानंतर बोराटे याला अटक करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक मोरे तपास करत आहेत.

# PCNTDA जमिनीवरील रहिवाशांना 7/12 उतारा व प्रॉपर्टी कार्ड देण्याची मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या (PCNTDA) आरक्षित जागांवर गेल्या ४० ते ५० वर्षांपासून वास्तव्य करणाऱ्या नागरिकांना मालकी हक्क मिळावा यासाठी चिंचवडचे आमदार शंकर चंद्रभागा पांडुरंग जगताप यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांना सविस्तर निवेदन सादर केले आहे. शासनाने या संदर्भात तातडीने विशेष बाब म्हणून धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी आग्रही मागणी त्यांनी केली आहे. १९७२ साली पिंपरी-चिंचवड परिसरात विविध शेतजमिनी व जागा आरक्षित करण्यात आल्या होत्या. १९८०-९० च्या दशकात स्थानिक शेतकऱ्यांनी त्या जागांवर गुंठा-दोन गुंठा प्लॉटिंग करून कामगार व अल्प-मध्यमवर्गीय नागरिकांना जागा विकल्या. त्या जागांवर नागरिकांनी घरे बांधून गेली अनेक दशके वास्तव्य केले आहे. नंतर हे प्राधिकरण PMRDA मध्ये विलीनीकरण झाले असून, ताब्यातील भूखंडांचा कारभार पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे सोपविण्यात आला आहे. या घरांना महानगरपालिकेकडून नियमित पाणीपट्टी, मालमत्ता कर आकारला जात आहे. महावितरणकडून वीज कनेक्शन देखील दिले जात आहे. या साऱ्या नागरी सुविधा असतानाही नागरिकांच्या नावावर ना ७/१२ उतारे आहेत, ना प्रॉपर्टी कार्ड उपलब्ध आहे.या ताबेदारांकडे ताबा असूनही अधिकृत मालकी नसल्यामुळे प्लॅन मंजुरी, गृहकर्ज, कायदेशीर हस्तांतरण यासंदर्भात अडचणी निर्माण होत आहेत. शासनाने विशेष धोरण आखावे व दीर्घकालीन ताबेदारांना कायदेशीर मान्यता द्यावी, अशी आमदार जगताप यांची ठाम मागणी आहे.१८ जून २०२१ रोजी झालेल्या पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आमसभेच्या ठराव क्रमांक ५९ मध्ये या ताबेदारांना नाममात्र एक रुपयाच्या प्रीमियमवर हस्तांतरण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या ठरावाला शासनमान्यता मिळणे आवश्यक असल्याचेही जगताप यांनी नमूद केले आहे.

**मुख्यमंत्र्यांना सादर केलेल्या मुख्य मागण्या पुढीलप्रमाणे आहेत :**

1. गुंठेवारी प्रकल्पातील ताबेदारांना मालकी हक्क बहाल करावा.2. घरपट्टी, वीजबिल, पाणीपट्टी यासारख्या शुल्काचा ताब्याचा पुरावा म्हणून स्वीकार करावा.3. ७/१२ उतारा व प्रॉपर्टी कार्ड नागरिकांच्या नावावर तातडीने नोंदवावे.4. महापालिकेच्या ठरावाला मान्यता देऊन एक रुपयात भूखंड हस्तांतर करण्यास संमती द्यावी.5. यासंदर्भात विशेष शासन आदेश काढून निर्णय प्रक्रिया मार्गी लावावी.6. हजारो मध्यमवर्गीय कुटुंबांना कायदेशीर संरक्षण, नागरी सुविधा आणि मालकी हक्क मिळण्यासाठी संबंधित यंत्रणांना तातडीचे निर्देश द्यावेत.

"पिंपरी-चिंचवड शहरातील हजारो कुटुंबे गेली अनेक वर्षे या जागांवर वास्तव्यास आहेत. प्रशासन त्यांच्या घरांना कर आकारतो, सुविधा पुरवतो; पण मालकी हक्क नाकारतो. हे अन्यायकारक असून, शासनाने या गंभीर समस्येवर तातडीने निर्णय घेऊन न्याय द्यावा," असे आमदार शंकर जगताप यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.

यासंदर्भात लवकर निर्णय होण्याची अपेक्षा स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात आहे.

# संत तुकाराम' चित्रपटाच्या प्रमोशनची सुरुवात पुण्यातून!

## चित्रपट १८ जुलै २०२५ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



Curzon Films आणि Purushottam Studios एकत्र येऊन बनवलेला, 'संत तुकाराम' हा बहुप्रतिक्षित आणि भव्य चित्रपट लवकरच सर्व भारतात प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाचे पोस्टर्स आणि प्रभावी टीझर लॉंच केल्यानंतर, आता चित्रपटाच्या प्रमोशनची सुरुवात पुण्यातून झाली आहे. मुख्य कलाकार सुबोध भावे, शिवा सूर्यवंशी आणि शिना चोहन यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेतली आणि चित्रपटाबद्दल संवाद साधला.

चित्रपट 'संत तुकाराम' हा १७व्या शतकातील संत-poet तुकाराम महाराजांच्या जीवनावर आधारित आहे, ज्यांनी भक्तीला सामाजिक परिवर्तनाचे माध्यम बनवले. पुण्याच्या भेटीआधी अभिनेत्री शिना चोहन यांनी देहू येथील संत तुकाराम मंदिराला भेट देऊन आशीर्वाद घेतले.

दिग्दर्शक आदित्य ओम यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या या चित्रपटाचा टीझर अतिशय प्रभावी असून, तो तुकाराम महाराजांच्या अध्यात्मिक आणि सामाजिक प्रवासाची झलक दाखवतो. तुकाराम महाराजांचा प्रवास - एक दुःखाने ग्रस्त पती ते समाजासाठी आवाज बनलेला संत - हे या चित्रपटात उलगडले जाणार आहे.

या चित्रपटात संजय मिश्रा, अरुण गोविल, शिशिर शर्मा, हेमंत पांडे, गणेश यादव, मुकेश भट्ट, गौरी शंकर, ट्विंकल कपूर, रुपाली जाधव, D J अकबर सामी यांच्यासह अनेक दिग्गज कलाकार आहेत. मुख्य कथाकथन ज्येष्ठ अभिनेते मुकेश खन्ना यांच्या आवाजात असणार आहे, जे चित्रपटाला एक आध्यात्मिक आणि गंभीर बाजू देतील.

संगीतकार निखिल कामत, रवि त्रिपाठी आणि वीरल-लावण यांनी बनवलेलं संगीत हे अभंग आणि पारंपरिक संगीतावर आधारित असून, तुकारामांच्या भावनिक प्रवासाला अधिक प्रभावीपणे दर्शवेल. हा चित्रपट सर्व भारतीय प्रेक्षकांसाठी तयार करण्यात आला असून, त्याचे कथानक, संगीत आणि अभिनय सर्व धर्म, भाषा आणि प्रदेशांमधील प्रेक्षकांना जोडणारे ठरेल.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 05/07/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# कुरियर डिलिव्हरी बॉय बाबत कठोर नियमावली करा-सुलभा उबाळे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुण्यामध्ये एका कुरियर बॉय ने एका २२ वर्षीय तरुणीवर अत्याचार केले. ही धक्कादायक घटना यापुढे घडू नये, याकरिता पुणे शहरातील कुरिअर डिलिव्हरी एजंट बाबत कठोर नियमावली करण्यात यावी, अशी मागणी शिवसेनेच्या पुणे जिल्हा संघटिका तथा माजी नगरसेविका सुलभाताई उबाळे यांनी केली आहे.

त्यांनी आपल्या मागणीचे निवेदन पुणे जिल्हा निबंधक संजय राऊत यांना दिले. तसेच घरोघरी कुरिअर पोहोचवणाऱ्या डिलिव्हरी कुरिअर एजंट बाबत तातडीने कठोर नियमावली करावी, अशी मागणी केली. बलात्कार सारख्या घटना घडत आहेत, कुरियर डिलिव्हर करणाऱ्या कंपनीने आपल्या कुरियर बॉय बाबत संपूर्ण माहिती घ्यावी व आपल्या कार्यप्रणाली बाबत कठोर नियमावली करावी व संभाव्य धोक्यापासून महिला व मुलींचे रक्षण होईल असे नियम करावे, अशी मागणी सुलभाताई उबाळे यांनी केली आहे.

यावेळी त्यांच्यासोबत संपर्कप्रमुख पूजा रावतेकर, शिवाजीनगर विधानसभा अध्यक्ष अक्षदा धुमाळ ,कसबा विधानसभा उपशहर प्रमुख अश्विनी मल्हारी आदी उपस्थित होत्या.

# नाशिक महानगरपालिकाने घेतली विकास प्रकल्पाची माहिती

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : देशात सर्वाधिक वेगाने विकसित होत असलेल्या पिंपरी चिंचवड शहरात महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या नेतृत्वात शहरात विविध विकास कामांचे मॉडेल उभे राहिले आहे.

तसेच शहरातील नागरी समस्यांवर दीर्घकालीन आणि समतोल उपाययोजना तयार करण्यात आलेल्या विकास कामाचे मॉडेल जाणून घेण्यासाठी रस्ते रचना व एनएमटी प्रकल्पांसाठी तांत्रिक अनुभव व, विनिमय व अभ्यास या तीन दिवसीय दौऱ्याअंतर्गत नाशिक महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्या नेतृत्वाखालील अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला भेट दिली. महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी त्यांचे स्वागत केले.

यावेळी अभ्यास बैठकीला सह शहर अभियंता देवन्ना गट्टूवार, मनोज शेठीया, बापूसाहेब गायकवाड, उप आयुक्त अण्णा बोदडे, सचिन पवार, ममता शिंदे, कार्यकारी अभियंता हरविंदरसिंह बन्सल, सहाय्यक आयुक्त निवेदिता घार्गे, विशेष अधिकारी किरण गायकवाड तसेच विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच नाशिक महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर, प्रदीप चौधरी, मुख्य अभियंता रवींद्र बागुल, संदेश शिंदे, शहर अभियंता संजय अगरवाल, मुख्य सल्लागार अनिकेत कुलकर्णी, सल्लागार प्राची देशमुख, दीपा मनोगुली, प्रतिक गोद्रे, शिवलीला अरोरा हे अधिअक्रि उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरात सामाजिक भागीदारीतून युवकांना रोजगाराच्या संधी देणाऱ्या 'कौशल्यम', महिलांना आर्थिक सक्षम करणारा 'सक्षमा तसेच महानगरपालिकेच्या विकासाच्या दिशेने घेऊन जाणाऱ्या फॉक्सबेरी संचलित 'सीटी हब फॉर डेटा कम्युनिकेशन (CHDC), सीटी ट्रान्सफोर्मेशन ऑफिस(CTO), दिव्यांग भवन फाउंडेशन, स्थापत्य, हरित सेतू, ग्रीन बॉण्ड, इंटग्रेटेड कमांड कंट्रोल सेंटर, शहरातील पुराच्या व गटारीच्या पाण्याचे नियोजन, बस स्थानक व त्यांचा वापर, स्वच्छ भारत मिशन,गार्डन पीपीपी, आयसीसीसी, नवी दिशा, वेस्ट टू एनर्जी, पावसाळी पुरग्रस्त भागांतील पूल, जलशक्ती अभियान, स्वच्छ भारत अभियान, सीएसआर अंतर्गत सुरू असलेल्या कामांची माहिती घेतली. सस्टेनेबिलिटी सेल, क्लायमेट बजेट, सोशल इम्पॅक्ट बॉण्ड, म्युनिसिपल बॉण्ड, इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्प, टीडीआर योजना, स्मार्ट स्ट्रीट, सौर उर्जा वापर, जलनियोजन, सीवरेज ट्रीटमेंट, ईआयसीसी सादरीकरण, रोड असेसमेंट मॅनेजमेंट सिस्टम अशा अनेक शहरी उपक्रमाची तसेच शहरात सुरु असलेल्या विकास कामांची व प्रकल्पांची माहिती संगणकीय सादरीकरणाद्वारे नाशिक महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली.

शहरातील विकास कामांची पाहणी करतांना नाशिक महानगरपालिका अधिकाऱ्यांनी शहरातील थेरगाव येथील ' बटरफ्लाय' पूल, गुरुवर्य भोसरीकर माऊली तथा ज्ञानोबा भीमाजी लोंढे पादचारी पूल, वाकड येथील टीडीआर स्कीम, मोशी येथील वेस्ट टू एनर्जी प्रकल्प तसेच विविध ठिकाणी भेटी दिल्या.

शहराट सुरु असलेल्या विकासकामांचे कौतुक केले व असेच प्रकल्प नाशिक शहरात राबविण्याचा मानस यावेळी व्यक्त अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

# बालगुन्हेगारी वाढीवर आ.अमित गोरखे यांची विधानपरिषदेत लक्षवेधी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

राज्यभरात अल्पवयीन मुलांमध्ये वाढत चाललेल्या गुन्हेगारी प्रवृत्तींविषयी विधानपरिषदेत आवाज उठवत, भारतीय जनता पक्षाचे आमदार अमित गोरखे यांनी या चिंताजनक विषयावर शासनाचे लक्ष वेधले.पुणे शहरासह राज्यातील अनेक भागांत अल्पवयीन मुले गुन्हेगारीकडे वळत असून, सोशल मीडियाच्या अनियंत्रित प्रभावामुळे ही समस्या अधिक तीव्र होत आहे, असे त्यांनी सभागृहात स्पष्टपणे मांडले.गोरखे म्हणाले की, गुन्हेगारी रील्स, हिंसक स्टेटस आणि गुन्हेगारीचं उदात्तीकरण करणाऱ्या व्हिडिओंमुळे अनेक अल्पवयीन मुलांना गुन्हेगारी प्रसिद्धी वाटू लागली आहे.शिक्षण, क्रीडा आणि संस्कार यासाठीचं वय असताना ही मुले चुकीच्या मार्गाकडे वळत आहेत, ही बाब अत्यंत गंभीर



आणि चिंताजनक आहे."त्यांनी अधोरेखित केलं की, गुन्हेगारीला ‘स्टाईल’ किंवा ‘शौर्य’ समजून मुलं त्याकडे आकृष्ट होत आहेत. यामागे सोशल मीडियावर प्रचंड प्रमाणात व्हायरल होणाऱ्या व्हिडिओंचा मोठा वाटा आहे. पिंपरी-चिंचवडमधील ६० पेक्षा जास्त आर्थिकदृष्ट्या दुर्बल भागांत ही प्रवृत्ती जास्त तीव्रतेने जाणवते.बाल न्याय कायद्याचा गैरफायदा घेत गुन्हेगार अल्पवयीन मुलांचा वापर करतातयासोबतच, काही सराईत गुन्हेगार 'मोहरा' म्हणून अल्पवयीन मुलांचा वापर करत आहेत, याकडेही गोरखे यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. बाल न्याय (बालकांचे संरक्षण) कायदा, 2015 नुसार अशा अल्पवयीन मुलांवर सौम्य कारवाईच होत असल्यामुळे उदा. बाल सुधारगृहात ठेवून नंतर मुक्त करणे या कायद्यातील पळवाटा गुन्हेगारांना मदत करणाऱ्या ठरत आहेत. गोरखे यांनी नमूद केले की, “गुन्ह्याच्या योजनांमध्ये अल्पवयीन मुलांचा वापर करून काही गुन्हेगार शिक्षा टाळत आहेत. त्यामुळे या मुलांचं आयुष्य पणाला लागण्याची शक्यता वाढली आहे. हे थांबवण्यासाठी कायद्यात सुधारणा करणे आवश्यक आहे.”पिंपरी-चिंचवडमध्येच मागील महिन्यात आठपेक्षा जास्त गुन्हे मारामारी, चोरी, लुटमार यांसारखे शुल्लक कारणांवरून घडले. गोरखे यांनी स्पष्ट केलं की, ही समस्या केवळ त्यांच्या मतदारसंघापुरती मर्यादित नाही, तर संपूर्ण राज्यातच ही स्थिती गंभीर आहे."गुन्हेगारीचं उदात्तीकरण रोखण्यासाठी सोशल मीडियावर नियंत्रण आवश्यक आहे. शिक्षण, कौशल्यविकास, क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून मुलांना सकारात्मक पर्याय देणं अत्यावश्यक आहे," असे आमदार अमित गोरखे यांनी ठामपणे सांगितले.

अल्पवयीन मुलांना गुन्हेगारीपासून वाचवण्यासाठी आणि या समस्या मुळापासून सोडवण्यासाठी शासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज असून, बाल न्याय कायद्याच्या पळवाटा दूर करून त्याला अधिक परिणामकारक बनवणे,तसेच सोशल मीडियावर नियंत्रण आणणे, ही काळाची गरज आहे, असेही त्यांनी सभागृहात ठामपणे मांडले.

# एटीएममधून पैसे काढणाऱ्या ज्येष्ठाची फसवणूक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : एटीएममधून पैसे काढणाऱ्या ज्येष्ठ नागरिकाची चोरट्याने ४० हजारांची फसवणूक केल्याची घटना शंकरशेठ रस्त्यावरील ढोले-पाटील चौकात घडली. याप्रकरणी खडक पोलिसांनी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत एका ज्येष्ठाने खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्येष्ठ नागरिक नाना पेठेत राहायला आहेत. ते बुधवारी (२ जुलै) शंकरशेठ रस्त्यावरील ढोले-पाटील चौकातील (सेव्हन लव्हज चौक) एका बँकेच्या एटीएमध्ये दुपारी गेले होते.एटीएममध्ये एक चोरटा



त्यांच्या पाठोपाठ शिरला. पैसे काढणाऱ्या ज्येष्ठाकडे मदतीचा बहाणा केला. त्यांच्याकडून डेबीट कार्ड आणि सांकेतिक शब्द घेतला. ज्येष्ठाच्या डेबीट कार्डचा वापर न करता. चोरट्याने त्याच्याकडील डेबीट कार्ड वापरले. पैसे न बाहेर पडल्याने चोरट्याने तांत्रिक बिघाड असल्याची बतावणी केली. त्यानंतर चोरट्याने त्याच्याकडील डेबीट कार्ड ज्येष्ठ नागरिकाला दिले. पैसे न मिळाल्याने ते घरी गेले.

काही वेळानंतर त्यांच्या खात्यातून ४० हजारांची रोकड लांबविण्यात आल्याचे उघडकीस आले. चोरट्याने ज्येष्ठाच्या डेबीट कार्डचा वापर करुन खात्यातून पैसे लांबविल्याचे आल्याचे उघडकीस आले.

त्यानंतर पोलिसांकडे तक्रार दिली. पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली.

पोलिसांनी एटीएम परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण ताब्यात घेतले असून, सहायक पोलीस निरीक्षक वळसंग तपास करत आहेत.